15-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

DGS/ 12:10

15-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

DGS/ 12:10

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

पृ.शी./मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सह सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक 15 मार्च, 2012 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

सभापती : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन

मु. शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. उल्हास पवार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो".

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी अनुमोदन देत आहे.

सभापती : प्रस्ताव असा आहे की,

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो".

सोमवार, दिनांक 19 व मंगळवार, दिनांक 20 मार्च 2012 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या शुक्रवार, दिनांक 16 मार्च, 2012 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यन्त विधानमंडळ सचिवालयाच्या तळ मजल्यावरील टपाल कक्ष क्रमांक 017 मध्ये आणून द्याव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री. प्रभाकर नारायण धारकर, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. प्रभाकर नारायण धारकर, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. प्रभाकर नारायण धारकर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते"

कै. प्रभाकर नारायण धारकर यांचा जन्म 8 जुलै, 1929 रोजी रायगड जिल्ह्यात पेण येथे झाला. त्यांचे शिक्षण एरोनॉटिकल इंजिनिअर पर्यन्त झाले होते.

कै. धारकर यांनी कोकण ज्ञानपीठ या शिक्षण संस्थेची स्थापना करुन रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय केली तसेच त्यांनी पेण अर्बन बँकेचे 21 वर्षे अध्यक्ष, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे 16 वर्षे संचालक, पेण तालुका व रायगड जिल्हा खरेदी विक्री संघाचे चेअरमन, तसेच कोकण नागरी सहकारी बँक व राज्य सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. धारकर यांनी 1974-1981 या काळात पेण नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदही भूषविले होते. त्यांनी पेण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव कार्य केले होते.

कै. धारकर 1980 मध्ये कुलाबा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून तर 1990 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

तसेच त्यांनी 1993 ते 1995 या काळात राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये उच्च व तंत्र शिक्षण, ऊर्जा, सेवायोजन, फलोत्पादन, पर्यटन, बंदरे व खार जमिनी खात्याचे मंत्री म्हणूनही कार्य केले. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 27 डिसेंबर 2011 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहाचे माननीय नेते श्री.अजितदादा पवार यांनी विधान परिषदेचे माजी सन्माननीय सदस्य श्री.प्रभाकर नारायण धारकर यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी मी विद्यार्थी चळवळीमध्ये काम करीत होतो,तेव्हा त्यांच्या मुलाला भेटण्यासाठी गेलो होतो, तेव्हा ते पेणच्या कॉलेजचे यु.आर.होते. त्यावेळी माझा आणि आप्पा साहेबांचा संबंध आला आणि त्यावेळी मला पेण मधील विद्यार्थ्यांकडून त्यांच्या विषयी बरीचशी माहिती मिळाली होती. मात्र सगळयात एक विशेष बाब म्हणजे 1949 मध्ये कोकणातील एक माणूस एरोनॉटीकल इंजिनिअरींगचे शिक्षण घेण्यासाठी दुसरीकडे जातो.त्यामुळे आम्हाला स्वभाविकपणे त्या व्यक्तिमत्वाविषयी कॉलेजच्या दिवसापासूनच एक प्रकारचे आकर्षण होते.तसेच एरोनॉटीकल इंजिनिअरींगचे शिक्षण घेतल्यानंतर त्या पध्दतीच्या नोकरी-व्यवसायामध्ये न जाता, आपल्या ग्रामीण भागामध्ये कशा प्रकारे शिक्षण पोहोचविता येईल यासाठी तेथे त्यांनी शिक्षण संस्था काढल्या आणि केवळ सहकारामध्ये न अडकता आप्पासाहेबांनी नंतर रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात आणि विशेषत: ज्या भागामध्ये शिक्षण संस्था पोहोचल्या नव्हत्या अशा ठिकाणी देखील शिक्षण संस्था सुरु करुन तेथे शिक्षण उपलब्ध करुन देण्याचे काम केले.ज्यावेळी आपल्या राज्यामध्ये एन्रॉन प्रकल्प आला तेव्हा आमचा आप्पासाहेबांशी संघर्षाचा संबंध आला. ते या ऊर्जा राज्यमंत्री होते. तेव्हा जी आंदोलने झाली, त्यावेळी सुध्दा एन्रॉन प्रकल्पाच्या संबंधातील माहिती, ऊर्जेच्या संबंधातील माहिती त्या चळवळीतील लोकांना सहजपणे दिली जात होती. मला असे वाटते की, राजकारणाकडे एका वेगळ्या नजरेने पहाणारे असे ते राजकीय कार्यकर्ते होते. सध्याच्या परिस्थितीत पेण अर्बन बँकेची अवस्था काहीही झाली असली तरी सहकार कसा चालवावा याचा आदर्श घालून देणारे असे आप्पासाहेब होते आणि अशी व्यक्ती आपल्यातून निघून जाणे ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने नक्कीच एक हानी झालेली आहे असे मला वाटते. मला आप्पासाहेबांना विनम्र श्रध्दांजली वहात असताना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला मी पाठिंबा देतो.

. . . .बी - 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी कै.प्रभाकर नारायण धारकर यांच्या शोक निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला मी अनुमोदन देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, कै.प्रभाकर नारायण धारकर हे रायगड जिल्ह्याचे सुपूत्र असून या जिल्ह्यामध्ये सहकाराची मुहूर्तमेढ रोवण्यामध्ये त्यांचा प्रमुख सहभाग होता आणि त्यावेळी त्यांनी घेतलेली भूमिका ही आजही सर्वांना आदर्श वाटते. आज महाराष्ट्रामध्ये सर्वात उत्कृष्ट जिल्हा बँक म्हणून ओळखली जाते, त्या रायगड जिल्हा बँकेचे ते सतत 16 वर्षे संचालक होते. सन्माननीय सदस्य आणि आमचे सहकारी श्री.जयंत प्र.पाटील हे त्या बँकेचा सर्व कारभार सांभाळत आहेत. तसेच कै. धारकर हे कुलाबा जिल्ह्याच्या प्राधिकारी संस्थेमधून निवडून आले होते परंतु ते पेण नगरपालिकेचे नगराध्यक्ष देखील होते. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये उच्च व तंत्र शिक्षण, ऊर्जा, सेवायोजन, फलोत्पादन, पर्यटन, बंदरे व खार जमिनी विभाग अशा अनेक खात्यांचा कार्यभार सांभाळला आहे. याठिकाणी ऊर्जेच्या संबंधात माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी उल्लेख केला आहे की, ते त्यावेळी एन्रॉन प्रकल्पाच्या बाबतीत माहिती घेऊन त्याबाबत लोकांचे प्रबोधन करीत असत. मला नक्की असे वाटते की, कोकणातील जनतेची काळजी घेणारे असे हे व्यक्तिमत्व असल्याने, त्यांनी आता देखील जैतापूरच्या संबंधात देखील लोकांच्या बाजूनेच भूमिका घेतली असती आणि या प्रकल्पाला विरोध केला असता. अशा प्रकारचे एक व्यक्तिमत्व, ज्येष्ठ सुधारक आपल्यामधून हरपलेला आहे. मी माझ्यावतीने आणि माझ्या पक्षाच्यावतीने त्यांना आदरांजली अर्पण करतो. धन्यवाद.

. . . .बी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपल्या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य तसेच महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळातील उच्च व तंत्र शिक्षण, ऊर्जा, सेवायोजन, फलोत्पादन, पर्यटन, बंदरे व खान जमिनी इ.विविध विभागांचे माजी मंत्री तसेच कोकण विभागातील एक अत्यंत कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्व यादृष्टीने कै.प्रभाकर नारायण धारकर यांचा सगळया कोकण विभागाला परिचय होता.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

व्यक्तिगत ते माझेही अनेक वर्षे सहकारी मित्र होते. आम्ही दोघांनीही या राज्याच्या मंत्रिमंडळात काम केलेले आहे. विशेषत: कोकण विभागामध्ये त्यांनी सातत्याने केलेले काम भूषणावह अशा प्रकारचे आहे. कोकणचा विकास व्हावा, कोकण विभागातील विद्यार्थ्यांना अत्यंत चांगल्या पध्दतीचे उच्च शिक्षण मिळावे या दृष्टीने त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. पेण अर्बन बँकेचे ते 21 वर्षे अध्यक्ष होते. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे 16 वर्षे संचालक, पेण तालुका व रायगड जिल्हा खरेदी विक्री संघाचे चेअरमन तसेच कोकण नागरी सहकारी बँक व राज्य सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. शैक्षणिक, सामाजिक व सहकारी क्षेत्रामध्ये एक अत्यंत तळमळीने काम करणारा कार्यकर्ता, नेता या दृष्टीने त्यांची ओळख महाराष्ट्राला होती. कै. धारकर हे 1974-1981 या काळात पेण नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते. सन 1980 मध्ये कुलाबा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून तर 1990 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर ते निर्वाचित झाले होते. तसेच 1993-1995 या काळात राज्य मंत्री मंडळात उच्च व तंत्र शिक्षण, ऊर्जा, सेवायोजन, फलोत्पादन, पर्यटन, बंदरे व खार जमिनी इत्यादी खात्याचे ते मंत्री होते. या सदनाचे माजी सदस्य कै. प्रभाकर नारायण धारकर यांचे दिनांक 27 डिसेंबर, 2011 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयाकडे पाठविण्यात येईल.

प्रथेप्रमाणे सभागृहाची बैठक 20 मिनिटे तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.22 ते 12.42 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज दिनांक 15 मार्च, 2012 रोजी सकाळी 9 वाजून 38 मिनिटांनी माझ्याकडे सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, श्री चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील यांनी "सन 2008 मध्ये अरबी समुद्रामध्ये शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक बांधण्याची घोषणा करण्यात येणे, 309 फुटांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ पुतळ्याचे स्मारक बांधण्यासाठी 350 कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा करणे, त्याकरिता निविदा काढण्यात येणे, त्यानंतर केंद्रीय पर्यावरण विभागाने स्मारक बांधकामास सागरी किनारा नियमावलीचे उल्लंघन झाल्यामुळे परवानगी न देणे, राज्य शासनाने या संदर्भात केंद्राकडून परवानगी मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न न करणे, या संदर्भात सभागृहाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे विशेष बाब म्हणून सागरी किनारा नियंत्रण नियमावलीतून सूट मिळण्यास्तव ठराव पाठविण्याची आवश्यकता" या विषयावर महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये सर्व कामकाज बाजूला ठेऊन चर्चा करण्यासाठी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

हा विषय 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो या बाबत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अरबी समुद्रातील स्मारकाचा विषय आज सर्वांनी वर्तमानपत्रातून वाचला आहे. सभापती महोदय, नियम 289 अन्वयेची सूचना आम्ही का दिली आहे त्याचे कारण मी सांगतो. त्याचप्रमाणे सूचनेतील विषय नियम 289 अन्वयेच्या निकषांमध्ये कसा बसतो ते देखील मी सांगणार आहे.

सभापती महोदय, मी प्रथम माननीय उप मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या संदर्भातील जी वस्तुस्थिती आहे ती स्पष्टपणे सांगितली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम राज्याला झेपणारे नाही असे ते म्हणाले आहेत. परंतु त्यांच्या सहका-यांनी या राज्यातील जनतेची जाणीवपूर्वक दिशाभूल केली आहे, लोकांची शुध्द फसवणूक केलेली आहे. विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी जाहीर केलेल्या संयुक्त जाहीरनाम्यामध्ये स्मारकाचा विषय समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या विषयाचा उल्लेख करण्यात आला होता. या स्मारकासाठी खर्च होणाऱ्या 300 कोटी रुपयांपैकी 50 कोटी रुपये प्रत्यक्षात वितरित करण्यात आले. छत्रपती शिवरायांच्या स्मारकाचा विषय जाहीरनाम्यात आणून जनतेकडे मते मागितली गेली. पुढे राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये हा विषय आल्यानंतर सर्वांनी बाके वाजविली होती. आम्ही हे काम करीत आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न झाला. परंतु प्रत्यक्षात हे स्मारक करण्याची वेळ आल्यावर केंद्रीय पर्यावरण खाते परवानगी देत नाही असे सांगितले जाते. वास्तविक सी.आर.झेड.चा कायदा 1991 सालातील आहे. त्यानंतर दिनांक 7.12.2011 रोजी त्या कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. परंतु हा कायदा करीत असताना पोर्ट ॲक्टिव्हिटी, मरीन ॲक्टिव्हिटीसाठी अपवाद करण्यात आला. त्याचा फायदा इतर राज्यांनी घेतला आहे. परंतु आपले राज्य या स्मारकाविषयी गंभीर नाही. मुळात हे स्मारक करण्याविषयी या सरकारमध्ये गांभीर्य होते का ? केवळ जनतेची मते घेण्यासाठी हा विषय पुढे केला होता का असा मला प्रश्न पडला आहे. त्यामुळे आम्हाला या विषयाबाबत चर्चा उपस्थित करावयाची आहे. हे सरकार जनतेच्या भावनांशी खेळत आहे. स्मारकाबद्दल आदराची भावना निर्माण झाल्यावर ते होणार नाही असे सांगितले जाते. हे महाराष्ट्रातील कोणत्याही व्यक्तीला न पटणारे आहे. केंद्रीय पर्यावरण खात्याकडे परवानगी मागितली होती अशी राज्यातील अधिकाऱ्यांनी आता माहिती दिली आहे. या स्मारकासाठी समुद्रात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

भराव घालावयाचा होता. त्याऐवजी तेथे स्पील्ट वर्क करण्याबाबत अर्ज करता येईल काय याबाबत कोठेही गांभीर्याने चर्चा केली नसल्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जेम्स लेन यांनी पुस्तकातून अनुचित लिखाण केले होते. त्या विषयी आपण बोलला नाही. सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी दोन वर्षापूर्वी पाचाड येथे शिवसृष्टी निर्माण करण्याची घोषणा केली होती. त्यासाठी अद्याप 5 एकर जमीन मिळवून देता आलेली नाही. म्हणजे या शासनाकडून केवळ घोषणाच केल्या जातात. त्यामुळे या महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या स्मारकाबाबत वास्तव काय आहे ते एकदा राज्यातील जनतेला कळू द्या. अरबी समुद्रामध्ये हे स्मारक झाले पाहिजे असे आम्हाला वाटते. राजकारण आपण बाजूला ठेवू या. हे स्मारक होण्यासाठी कायद्याला अपवाद करुन केंद्र सरकारची परवानगी मिळविली पाहिजे. त्यासाठी राज्य सरकारने प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी येथे चर्चा होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला अनुमती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेतील विषय निकषात कसा बसतो हे सांगण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली आहे त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक होण्यासाठी या सभागृहात नियम 289 अन्वये आम्हाला प्रस्ताव आणावा लागतो. ही सर्वांना लाजिरवाणी वाटणारी बाब आहे. ज्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, ज्यांच्यामुळे आम्ही महाराष्ट्रामध्ये सन्मानाने जगत आहोत त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय केवळ राज्यपालांच्या अभिभाषणातच आला असे नाही तर या सरकारने सलग 3 वर्षे अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. अर्थसंकल्पामध्ये सतत 3 वर्षे आर्थिक तरतूद केल्यानंतर या स्मारकाला आता परवानगी मिळत नाही अशा प्रकारची बातमी सर्व वर्तमानपत्रात छापून येते. त्यावेळी मात्र दु:ख होते. सभापती महोदय, गोवा राज्यात अशा प्रकारच्या कामासाठी परवानगी मिळाली आहे. लवासाच्या बांधकामाबाबत आतापर्यंत कोणावरही कारवाई झालेली नाही. त्यासाठी दिल्लीमध्ये

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

बैठका होतात. 'आदर्श' या नावाची इमारत उभी राहू शकते. मग या सर्व बाबी छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा मोठ्या आहेत काय ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या या महाराष्ट्रामध्ये त्यांचे स्मारक उभे करण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आलेली आहे. हे स्मारक उभे करण्याची आम्ही मागणी केली नव्हती किंवा राज्यातील जनतेनेही तशी मागणी केलेली नव्हती. शासनाने जाहीर केलेली ही बाब आहे. मग आता घोडे अडले कोठे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

तुम्हाला परवानग्या मिळत नव्हत्या तर मग घोषणा कशासाठी केल्या ? निवडणुका डोळयापुढे ठेवून सवंग लोकप्रियतेसाठी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने राजकारण करण्याची जी पध्दत आहे ती योग्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य असे स्मारक अरबी समुद्रामध्ये उभे करण्याची घोषण निवडणुकीच्या आधी या शासनाने केली आणि आता निवडणुका संपल्यानंतर परवानग्या मिळत नाहीत असे हे शासन सांगत आहे. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय महत्वाचा आहे. तेव्हा आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी राज्याच्या पर्यावरण विभागाने काय निर्णय घेतलेला आहे, त्या विभागाने काय शिफारस केलेली आहे, हा खरा मुद्दा आहे. राज्याच्या पर्यावरण विभागानेच मुळात या स्मारकाला हरकत घेतलेली आहे. सभापती महोदय, रेडिओ क्लबच्या समोर रेडिओ क्लबची जेट्टी आणि तेथे असलेले 50 वर्षापासूनचे बांधकाम राज्य शासनाचे माननीय उपमुख्यमंत्री ताब्यात घेऊ शकलेले नाहीत. त्या ठिकाणी बेकायदेशीर हॉटेल चालविले जात आहे. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात पर्यावरण विभागाच्या माध्यमातून या ठिकाणी चर्चा झाली पाहिजे. आम्ही अमेरिकेला जाऊन तेथील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी पाहिलेला आहे. सभापती महोदय, स्मारक बांधल्याने पर्यावरणाची कोणती हानी होते ते मला काही समजले नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे गेली 25 वर्षे सभागृहामध्ये ही मागणी करीत आले आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी सांगितले होते की "मी दिल्लीला जाईन आणि माझे सर्व वजन वापरुन आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या मिळवीन." सभापती महोदय, आपण देखील त्यावेळी या सभागृहामध्ये सभापतीस्थानी होता. या स्मारकाबाबत राज्य शासन गंभीर नाही. म्हणून या विषयावर विस्तृत चर्चा करण्याची मी मागणी करीत आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाचे मी समर्थन करण्यासाठी उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर....

भव्यदिव्य स्मारक अरबी समुद्रामध्ये व्हावे यासाठी शासनाने किती प्रयत्न केलेले आहेत हे आपण वृत्तपत्रातून वाचलेले आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, राष्ट्रीय स्मारकाच्या संदर्भात हे शासन उदासीन दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देखील केन्द्र शासनाकडून परवानगी घ्यावयाची आहे. तेव्हा याही बाबतीत शासन काय करणार आहे ? केन्द्र शासनाकडून आवश्यक त्या परवानग्या मिळविण्यासाठी केन्द्र शासनाला विनंती करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा आणि ही दोन्ही स्मारके लवकरात लवकर करावीत अशी मी विनंती करतो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य मान्यवर नेत्यांनी आणि सन्माननीय सदस्यांनी दिलेला आहे.

सभापती महोदय, काल चहापानाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, जवळपास दीड महिन्याचे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. या अधिवेशनामध्ये विरोधी पक्षाच्या वतीने कोणतीही चर्चा पुढे आली तर ती चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. तेव्हा याही विषयाच्या बाबतीत सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे. परंतु आपले विचार मांडत असताना सरकार हे करणार नाही, हे सरकारला झेपणार नाही असे जे वक्तव्य केले गेले ते योग्य नाही. सगळे काही झेपू शकते, फक्त परवानगीची आवश्यकता असते.. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी काही उदाहरणे दिली त्यामध्ये काहींना घरी जावे लागलेले आहे हे आपणास माहीत आहे. तेव्हा उदाहरणे कसली देता...(अडथळा).. मी एवढेच सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात जी काही वस्तुस्थिती आहे ती सर्वांना कळली पाहिजे. गेली 10 वर्षे यासंबंधीची चर्चा चालू आहे. अनेक वेळा वेगवेगळया माध्यमातून, जाहीरनाम्यातून हा मुद्दा लोकांसमोर मांडलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

शेवटी पर्यावरण विभागाची परवानगी असल्याशिवाय कोणतीही गोष्ट होऊ शकत नाही. आपण युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभे करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यामध्ये कोणतीही गोष्ट चुकीची असता कामा नये, अशी राज्य शासनाची भूमिका आहे. सभापती महोदय, आपण या चर्चेसाठी जो वेळ ठरवाल, जो दिवस ठरवाल त्यावेळी चर्चा करण्याची राज्य सरकारची पूर्णपणे तयारी आहे. त्या चर्चेच्या वेळी विरोधी पक्ष सदस्यांनी त्यांची भूमिका मांडावी, त्या संदर्भात उत्तर देण्याची राज्य सरकारची पूर्णपणे तयारी आहे.

सभापती : धन्यवाद. आज नियम 289 अन्वये जी सूचना सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे, त्या सूचनेच्या बाबतीत मी निर्णय देत आहे. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेचा विषय आजच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट केलेल्या कोणत्याही बाबीशी संबंधित नाही. तरी देखील महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दलचा हा विषय असल्यामुळे मी या विषयास सर्वोच्च प्राधान्य देत आहे व ही चर्चा मान्य करीत आहे. उद्या प्रश्नोत्तराचा तास व लक्षवेधी सूचना संपल्यानंतर नियम 97 अन्वये ही चर्चा घेण्याचा मी निर्णय घेतलेला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 1-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 4-मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यमंत्री महोदय हे कागदपत्रे वाचून अध्यादेश सभागृहासमोर मांडत आहेत. माननीय राज्यमंत्री महोदयांकडून जे वाचन केले जात आहे, ते संबंधित खात्याने तपासून घ्यावे. त्याचे कारण असे आहे की, माननीय राज्यमंत्री महोदय हे काल दूरदर्शन वाहिनीवरील संवादामध्ये माझ्या समवेत होते. प्रत्येक राज्यात सरकारकडून कायदे केले जातात. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या गुन्हेगाराला अटक केली जाते. केलेल्या कायद्याप्रमाणे गुन्हेगाराला अटक केली जाते, अटक एफ.आय.आर. नुसार करतात की, एफ.आर.आय.नुसार करतात. यासंबंधी त्यांच्या मनात गोंधळ निर्माण झालेला आहे,एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : आपण कायद्याच्या बाबतीत निष्णात आहात. त्यामुळे माननीय राज्यमंत्री महोदयांना आपण कशाला गोंधळात टाकत आहात ?

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

(पुढे सुरु...)

श्री. अजित पवार (वित्त व ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 2- महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 3- मुंबई वीज शुल्क (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

श्री. अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011-2012 या वर्षाच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती : सन 2011-2012 या वर्षाच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाव्दारे वितरित करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

सभापती : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सह सचिव वाचून दाखवितील.

सह सचिव : (अ) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली :-

सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक-22 मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) विधेयक, 2011.

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

(1) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 48 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2011.

(2) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 49 - महाराष्ट्र महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, 2011.

(3) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 52 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक, 2011.

(4) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 53 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2011.

(5) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 56 - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2011.

(6) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 57 - महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, 2011.

(7) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 58 - महाराष्ट्र विनियोजन (द्वितीय अधिक खर्च) विधेयक, 2011.

(8) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 59 - महाराष्ट्र विनियोजन (तृतीय अधिक खर्च) विधेयक, 2011.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सह सचिव.....

(9) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 60 - महाराष्ट्र विनियोजन (चतुर्थ अधिक खर्च) विधेयक, 2011.

(10) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 63 - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, 2011.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 16 मार्च, 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक 14 मार्च, 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय ठरावांना वेळ देण्यात यावा अशी समितीने शिफारस केली आहे.

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

1. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक-17 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 78 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. श्री.संदिप बाजोरिया, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक 3 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

सभापती : विधानपरिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरून मी सभागृहास कळवितो की, महाराष्ट्र विधानपरिषदेवर महाराष्ट्राच्या राज्यपालांनी नामनियुक्त केलेले सदस्य श्री.सुभाष गणू भोईर, वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा शनिवार, दिनांक 21 जानेवारी, 2012 रोजी मध्यान्हपूर्व स्वीकारला आहे.

.5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

सभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 8(1) अन्वये खालील सदस्यांची सभापती तालिकेवर नामनियुक्ती करतो.

(1) श्री.मोहन जोशी, वि.प.स.

(2) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(3) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

(4) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे भूतपूर्व उप पंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या परिसंवादाबाबत घोषणा

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांना विदित आहेच की, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे भूतपूर्व उप पंतप्रधान स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष दिनांक 13 मार्च, 2012 ते 12 मार्च, 2013 या कालावधीत साजरे कले जात आहे. त्याचे औचित्य साधून महाराष्ट्र विधिमंडळाच्या वतीने दिनांक 17 व 18 मार्च, 2012 रोजी मध्यवर्ती सभागृह, विधानभवन, मुंबई येथे "महाराष्ट्र - काल, आज आणि उद्या" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

दिनांक 17 मार्च, 2012 रोजी सकाळी 10.30 वाजता परिसंवादाचा उद्घाटन सोहळा महामहिम राज्यपाल श्री.के.शंकरनारायणन यांच्या शुभहस्ते तसेच माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. हा परिसंवाद दिनांक 17 व 18 मार्च, 2012 रोजी एकूण 4 सत्रात संपन्न होणार आहे.

दिनांक 17 मार्च, 2012 रोजी उद्घाटन सोहळ्यानंतर सकाळी 11.30 ते दुपारी 2.00 या कालावधीत पहिले सत्र व दुपारी 3.00 ते सायंकाळी 5.00 या कालावधीत दुसरे सत्र आयोजित करण्यात आले आहे. तद्नंतर दुसऱ्या दिवशी दिनांक 18 मार्च, 2012 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 या कालावधीत तिसरे सत्र व दुपारी 3.00 ते सायंकाळी 5.00 या कालावधीत..

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

चौथे सत्र आयोजित करण्यात आले आहे. तसेच त्यानंतर सायंकाळी 5.00 ते 6.00 या कालावधीत एका विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले असून या वेळेत **"महाराष्ट्र- काल, आज आणि उद्या : एक दृष्टीक्षेप"** या विषयावर श्री. शरद्चंद्र पवार, माननीय कृषी मंत्री, भारत सरकार हे आपले विचार व्यक्त करणार आहेत. या परिसंवादाकरिता वक्ते म्हणून केंद्रीय मंत्री, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय मंत्री गण, विधिमंडळ सदस्य त्याचबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी 9.00 ते 10.00 या काळात लॉबीत अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. भोजनाची व्यवस्था दुपारी 2.00 ते 3.00 या कालावधीत दुसरा मजला विधानभवन येथे करण्यात आली आहे. सदरहू परिसंवादात महाराष्ट्र राज्याच्या गेल्या 50 वर्षाच्या वाटचालीतील सिंहावलोकन, वर्तमानाचा उल्लेख व भविष्यात निर्माण होण्याची शक्यता असलेल्या समस्या यांचा उहापोह या निमित्ताने होणे अपेक्षित आहे. मला खात्री आहे की सर्व सन्माननीय सदस्य या उद्घाटन सोहळ्यामध्ये तसेच दोन्ही दिवशी परिसंवादाच्या सत्रांच्या निमित्ताने होणाऱ्या वैचारिक मंथनात सहभागी होतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 16 मार्च, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 06 मिनिटांनी शुक्रवार, दि. 16 मार्च, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही